लोकमत

# जळगावात सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी 'सायबर वॉरियर्स'

**जळगाव** : विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराच्या अंतर्गत 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत पुणे येथे नुकत्याच आयोजित 'सायबर वॉरियर्स क्लब ऑफिसर ट्रेनिंग'मध्ये विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेतील चार विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली.

क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांच्या हस्ते क्लबची अधिकृत स्थापना करण्यात आली. क्लबच्या अध्यक्षपदी जान्हवी सपकाळे, सचिवपदी वैष्णवी सैतवाल, उपक्रम प्रमुखपदी जय ठाकूर आणि मीडिया प्रमुखपदी राहुल चोपडे यांची निवड झाली असून, प्रा. डॉ. राजू आमले यांच्याकडे शिक्षक समन्वयक म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

Jalgaon Main
Page No. 4 Jul 04, 2026
Powered by: erelego.com